# एम.बी.मोरे महीला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबीरास शुभारंभ

एम.बी.मोरे फाऊंडेशनचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छता अभियानावर आधारित विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर २०१९-२० दि.०६ जानेवारी २०२० ते १२ जानेवारी २०२० या कालावधीत आयोजित केला असून या शिबीराचे उदघाटन सोमवार, दि. ०६.०१.२०२० रोजी रा.जि.प. शाळा विष्णूनगर, पो.धाटाव या ठिकाणी झाले.

या उदघाटन प्रसंगी रोहा तालुक्याचे पोलिस निरीक्षक मा.श्री. नामदेव विठठल वंडतर, सहाय्यक पोलिस निरीक्षक मा.श्री.दिपक म्हशीलकर, एम.बी.मोरे फाऊंडेशनचे मा.श्री.अनिल गावंड, विष्णूनगरचे ग्रामस्थ श्री.हरी खैरे, सौ.कल्पना मोरे, श्री.उमेश रटाटे, सौ.रविना मोरे, सौ. श्वेता महाडिक, सौ. अंजना मोरे, श्री. संतोष महाडिक, श्री.नथुराम रटाटे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमामध्ये पोलिस निरीक्षक श्री. नामदेव वडतर यांनी शिबीरातील स्वयंसेविकांना महीलांच्या कायदेविषयक माहीती व महीलांचा आत्मविश्वास वाढावा या उददेशाने स्वयंसेविकांना उदाहरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले त्याचबरोबर सायबर गुन्हे कसे होतात या विषयी माहीती सांगितली, स्वच्छता अभियानावर आधारित स्वच्छतेचे महत्व पटवून दिले तसेच प्लास्टिक प्रदुषणावर मार्गदर्शन केले.

या शिबीरासाठी एकूण ४० विद्यार्थीनी सहभागी झाल्या आहेत. या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रसन्न म्हसळकर यांनी केले. तर सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर पाखर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. नरेश घाग, प्रा. दिपेश भोसले, प्रा. प्रणाली महाडिक आणि सर्व कर्मचारी वर्ग यांनी सहकार्य केले.

एम.बी.मोरे फाऊंडेशनचे संस्थापक मा.श्री. विजयराव मोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीर सुरळितपणे पार पाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

Scanned by CamScanner